# महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालयाचे कार्य

- **ग्रंथ देवघेव :-**

ग्रंथालयामध्ये घेण्यात येणारे ग्रंथ व इतर वाचनीय साहित्य हे साधारणतः कायदा, विधिविधान, राज्यशास्त्र व लोकप्रशासन, संसदीय प्रथा व पद्धती, अर्थशास्त्र, शिक्षण, समाजशास्त्र, धर्म, कृषी, सिंचन, चरित्र, संस्कृती, आत्मचरित्र इत्यादी तसेच वार्षिके, शब्दकोश, ज्ञानकोश इ. सर्व ज्ञानशाखांना व्यापणारे आहे व त्याची व्यवस्था ग्रंथालय शास्त्रानुसार करण्यात आली आहे. सदर ग्रंथ व अपेक्षित माहिती ग्रंथालयाच्या नियमांनुसार सन्माननीय सदस्य, दोन्ही सभागृहाचे पीठासीन अधिकारी, विधानमंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येतात.

- **वाचन कक्ष :**

सन्माननीय सदस्यांना त्यांच्या सभागृहातील भाषणांच्या तयारी करिता ग्रंथालयामध्ये बसून काही टिपणे काढता यावीत, अभ्यास करता यावा, संदर्भ पाहता यावेत जेणेकरुन त्यांची सभागृहातील कामगिरी अभ्यासपूर्ण व उपयुक्त व्हावी या दृष्टिने सन्माननीय सदस्यांसाठी सुसज्ज, प्रशस्त व वातानुकुलीत अभ्यासिकाही संगणक व इंटरनेटच्या सुविधांसह ग्रंथालयाच्या 6 व्या मजल्यावर कक्ष क्र. 603 मध्ये उपलब्ध आहे.

❖ **ग्रंथालयामधून देण्यात येणाऱ्या संदर्भ सेवा -**

**(अ) वृत्तपत्रे कात्रणे विभाग :**

सन्माननीय सदस्यांना सभागृहात विविध चर्चांमध्ये भाग घेताना सुविहितपणे व प्रभावीपणे काम करता यावे या दृष्टिने उपयुक्त असे संदर्भ मिळण्यासाठी वृत्तपत्रांतील बातम्या, लेख, अग्रलेख इ. समाविष्ट असणारा वृत्तपत्रे कात्रणांचा विभाग आहे.

या ग्रंथालयात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रे व नियतकालिके येतात. त्यातील उपयुक्त बातम्या व लेखांची कात्रणे वर्गीकरण करुन विशिष्ट विषयांच्या फोल्डर्समध्ये एकत्रित ठेवण्यात येतात. आवश्यकतेनुसार ही माहितीची कात्रणे झेरॉक्स करुन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

अनेक प्रसंगी सन्माननीय सदस्यांना सभागृहात एखाद्या विषयावर बोलण्यासाठी सांख्यिकीय माहितीचीही आवश्यकता असते. पुरेसा वेळ दिल्यास अशी सांख्यिकीय माहिती संकलित करुन सन्माननीय सदस्यांना त्यांच्या मागणीनुसार पुरविण्यात येते.

**(ब) कामकाजविषयक संदर्भ :**

अनेकवेळा सन्माननीय सदस्यांना सभागृहात निरनिराळ्या विषयांवर पूर्वी सभागृहामध्ये झालेल्या महत्त्वाच्या चर्चा, जसे अशासकीय ठराव, प्रस्ताव, अविश्वासाचे ठराव, अल्पकालीन चर्चा, अर्धा-तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, विधेयके, लक्षवेधी सूचना, महत्त्वाची निवेदने इत्यादींबाबत कार्यवाही वृत्तांतील माहितीची त्वरित गरज असते. अशी माहिती सन्माननीय सदस्यांना त्वरित उपलब्ध करुन देण्यात येते.

**(क) अद्ययावत महाराष्ट्र अधिनियम :**

ग्रंथालयामध्ये "महाराष्ट्र अधिनियम" या कायद्याच्या संहितेच्या 1 ते 10 खंडांच्या प्रत्येकी 10 प्रती अद्ययावत करण्यात येऊन संदर्भासाठी ठेवण्यात येतात. केंद्रिय अधिनियमांसाठी अे.आय.आर. (All India Reporter) या प्रकाशनाच्या प्रती ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. सदर संहिता सन्माननीय सदस्यांना ग्रंथालयात बसून पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातात. सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निर्णयांच्या डेटाबेस असलेले AIR SC (1950- 2009), AIRHC (1985 - 2009) व SCC online (1950- 2009) हे तीन डेटाबेस ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

**(ड) संशोधकांना संदर्भ सहाय्य :**

एखाद्या विशिष्ट विषयाचा विशेष अभ्यास करणारे संशोधक किंवा पीएच.डी. चा अभ्यास करणारे संशोधक यांना त्यांच्या विषयांच्या अभ्यासासाठी लागणारे उपलब्ध संदर्भ रितसर पूर्वमान्यता घेवून या ग्रंथालयातून दिले जातात.

❖ **संकीर्ण.-**

- **"सदस्यांचा संक्षिप्त परिचय" प्रकाशन :**

प्रत्येक विधानसभेच्या कालावधीकरिता सभागृहाच्या "सदस्यांचा संक्षिप्त परिचय" हे प्रकाशन ग्रंथालयामार्फत काढण्यात येते. या प्रकाशानासाठी सन्माननीय सदस्यांची वैयक्तिक परिचय असणारी माहिती विहित प्रकारच्या फॉर्ममधून सन्माननीय सदस्यांकडून लेखी स्वरुपात मागविण्यात येऊन ती संक्षिप्त स्वरुपात संपादित केली जाते. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीतही नियत कालावधीनंतर अशाच प्रकारची पुस्तिका प्रकाशित करण्यात येते.

- **शोक प्रस्ताव :-**

दिवंगत सदस्य वा महनीय व्यक्तींच्या निधनाबद्दल सभागृहात सादर करण्यात येणाऱ्या शोकप्रस्तावांसंबंधीचे सर्व काम ग्रंथालय कक्षामार्फत करण्यात येते.

- **बाईंडिंग मशीन :**

ग्रंथालयामध्ये 1862 पासूनची राज्य विधिमंडळ व संसदेच्या दोन्ही सभागृहांची कार्यवाही वृत्ते तसेच अन्य काही दुर्मिळ कागदपत्रे आहेत, त्यांचे योग्य जतन करता यावे यासाठी ग्रंथालयामध्ये स्वयंचलीत स्पायरल बांधणी मशीन व कटिंग मशीन व्यवस्थापित करण्यात आली आहे.

- **झेरॉक्स सेवा :**

सभागृहाचे कामकाज सुरु असताना सन्माननीय सदस्यांना कामकाजासंदर्भात लागणारी माहिती विनाविलंब उपलब्ध करुन देता यावी तसेच, ग्रंथालयातून बाहेर देणे शक्य नसणाऱ्या ग्रंथांतील वा अन्य साहित्यातील हवी असणारी माहिती सदस्यांना त्वरीत झेरॉक्स करुनही देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.